**<u>प्रेसनोट</u>** दि. 27/03/2026

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, जुन्नर -आंबेगाव यांचे विरोधात लाचमागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष वय 48 वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | श्री गोविंद पंढरीनाथ शिंदे वय-46 वर्षे, पद- उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, जुन्नर -आंबेगाव उपविभाग, मंचर, ता. आंबेगाव जि. पुणे **(वर्ग-1)**, पत्ता- परिसर अपार्टमेंट, फ्लॅट न. 1201, डॉ. केतकर लेन, प्रभात रोड, डेक्कन, पुणे, मुळ पत्ता- सोनारी, ता. सिन्नर, जि. नाशिक. |
| **सुरवातीची लाच मागणी** | 5,00,000/- (पाच लाख रूपये) |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | 2,00,000/- (दोन लाख रूपये) |
| **पडताळणी दिनांक** | दि. 27/03/2026 |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | 2,00,000/- (दोन लाख रूपये) |
| **सापळा दिनांक** | दि. 27/03/2026 |
| **ठिकाण** | उप विभागीय कार्यालय, जुन्नर-आंबेगाव, मंचर ता. आंबेगाव जि. पुणे या शासकीय कार्यालयात |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9923444998) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9552574140) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे बांधकाम व्यवसायिक असून ते एका भागीदारी फर्मचे एक भागीदार आहेत. नमूद बांधकाम फर्मने इमारत बांधण्यासाठीच्या लागणाऱ्या सर्व शासकीय विभागाच्या परवानग्या ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठीचे, इमारत पूर्ण झाल्यावर पूर्णत्व प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे तसेच त्यासाठी लागणारे सर्व प्रकारचे शासकीय शुल्क भरणा करण्याचे सर्व अधिकार तक्रारदार यांना दिलेले आहेत. सदर भागीदारी फर्मने पुणे-नाशिक महामार्ग लगत नारायणगाव येथे Joint Venture मध्ये development साठी घेतलेल्या प्लॉटवर इमारतीचे बांधकाम सुरू केले होते. सदर इमारतीचे 90 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर तक्रारदाराने अंशतः पूर्णत्वाचा दाखला मिळण्याकरता उपविभागीय अधिकारी जुन्नर-आंबेगाव यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर तो प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांनी नगर रचना विभागाकडे पाठवून त्यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून स्वतःकडे प्रस्ताव राखून ठेवला होता. दि.20/03/2026 रोजी सदर प्रस्तावाबाबत तक्रारदार हे चौकशी करण्यासाठी गेले असता उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांनी तक्रारदाराने बांधलेल्या इमारतीसाठी अंशतः पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्याकरिता तक्रारदाराकडे पाच लाख रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दि. 24/03/2026 रोजी रोजी अँटी करप्शन ब्युरो पुणे येथे दिली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि. 27/03/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता पडताळणीदरम्यान नमुद आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे अर्जाप्रमाणे त्यांनी बांधलेल्या इमारतीस अंशतः पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मंजुर करून त्या मोबदल्यात तक्रारदाराकडे 2,00,000/- रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

पडताळणी कारवाई झाल्यानंतर दि. 27/03/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आलोसे गोविंद पंढरीनाथ शिंदे, उपविभागीय अधिकारी, जुन्नर-आंबेगाव यांना उपविभागीय कार्यालय मंचर या त्यांच्या शासकीय कार्यालयात 15:03 वाजता तक्रारदार यांचेकडून 2,00,000/- रुपये लाच रक्कम स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहात पकडण्यात आले.

आरोपी लोकसेवक यांच्याविरुद्ध मंचर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण पोलीस येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) व्हॉट्स-अॅप क्रमांक - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

27/3/26-

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.